महाराष्ट्र शासन
इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर - ४४० ०२२
दुरध्वनी क्र. ०७१२-२९५९३८१ CIN - U85300PN2019NPL187405 ई-मेल - mahajyotingp@gmail.com

जा. क्र महाज्योती/नागपूर/आस्था/२३८२/२०२४-२५ दिनांक – १८-०९-२०२४

# -: परिपत्रक :-

**विषय : महाज्योतीच्या विविध योजनेचा लाभ घेऊन यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांची यादी महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत.**

महाज्योती मार्फत इतर मागास OBC, SBC, VJNT या प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता विविध स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण तसेच अर्थसहाय्य योजना राबविण्यात येतात. सन २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये महाज्योती मार्फत राबविण्यात आलेल्या विविध स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण व अर्थसहाय्य योजनेचा लाभ घेऊन जे विद्यार्थी यशस्वी झालेले आहे. (राज्य शासनाच्या किंवा केंद्रीय शासनाच्या कुठल्याही शासकीय सेवेसाठी निवड झाली आहे.) अश्या विद्यार्थ्यांकडून यशस्वी झाल्याबाबतची माहिती महाज्योतीच्या कॉल सेंटर द्वारे मागविण्यात आलेली होती. या कार्यालयास प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारावर यशस्वी विद्यार्थ्यांची यादी महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे.

यशस्वी विद्यार्थ्यांची माहिती दूरध्वनी वरून घेण्यात आलेली आहे. माहितीमध्ये काही विसंगती असल्यास ती निदर्शनास आणून देण्याबाबत विद्यार्थ्यांना आवाहन करण्यात येत आहे. तसेच काही यशस्वी विद्यार्थ्यांची नावे सुटली असल्यास ती निदर्शनास आणून देण्यात यावी.

**स्वा.**
**(राजेश खवले)**
**व्यवस्थापकीय संचालक**
**महात्मा जोतिबा फुले संशोधन व**
**प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर**